# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.CIC/अ.क्र.६०८५ ते ६०९२/२०२६

श्री. राजरत्न जगजिवन जामनिक
शॉप नं : २० सी विंग कलश अपार्ट
संस्कृती सोसा मागे, लिंक रोड, आचोळे,
वसई (पूर्व), जि. पालघर-४०१२०८.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपीक,
इलाखा शहर विभाग, (सा.बां.वि.) यांचे कार्यालय, २ रा मजला,
बांधकाम भवन इमारत, २५ मर्झबान रोड, मुंबई-४०० ००१.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, (सा.बां.वि.) यांचे कार्यालय, २ रा मजला,
बांधकाम भवन इमारत, २५ मर्झबान रोड, मुंबई-४०० ००१.
**(अपिल क्र.६०८५ ते ६०८७)**

जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपीक,
सा.बां विभाग मुंबई ४०० ००१.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,
सा.बां विभाग मुंबई ४०० ००१.
**(अपिल क्र.६०८८ ते ६०९२)**

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १५.०७.२०२६</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

अपिलार्थीनी दाखल केलेल्या उपरोक्त अपिलांमध्ये जन माहिती अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग, इलाका शहर, मुंबई येथे **जोडपत्र अ** दाखल केले असून दिनांक ०१ एप्रिल २०२१ ते २०२२ या कालावधीतील माहिती मागितलेली आहे. या संदर्भात तत्कालीन अपिलीय अधिकारी यांनी या आधीच दिनांक २८ जून २०२२ रोजी त्यांच्या अपिलीय आदेशात उपरोक्त माहिती ही लवकरात लवकर विनामूल्य देण्याचे निर्देश दिले असून वरील आदेशाचे तात्काळ अनुपालन करण्याचे निर्देशात तसेच या विलंबास जबाबदार असणारे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याविरुद्ध **कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये शास्ती कारवाई का करण्यात येऊ नये याचा खुलासा सादर करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत सर्व द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहेत.**

**आदेश**

१. **वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
२. **अपिल क्र.६०८५ ते ६०९२/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

**स्वाक्षरीत/-**
**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १५-०७-२०२६**